# Goa International Film Festival "Film Bazaar – 2025 – News Paper Articles



## ‘देवाचं घर’, ‘श्री गणेशा’ ‘इफ्फी’त झळकणार

**मुंबई टाइम्स टीम**

गोवा येथे लवकरच ‘इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया’ अर्थात ‘इफ्फी’ हा महोत्सव रंगणार आहे. याअंतर्गत ‘फिल्म बाजार’ विभागासाठी राज्य शासनाच्या वतीनं महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत दरवर्षी मराठी चित्रपटांची निवड करून ते पाठविण्यात येतात. यंदा ‘फिल्म बाजार २०२५’करिता संकेत माने दग्दिर्शति ‘मुक्काम पोस्ट देवाचं घर’ आणि मलिदि कवडे दग्दिर्शति ‘श्री गणेशा’ या दोन मराठी सिनेमांची निवड करण्यात आली आहे. गेल्या दहा वर्षांपासून मराठी सिनेमांना आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यासपीठ मिळावं आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळावा या उद्देशानं महामंडळाच्या वतीनं ‘इफ्फी’च्या फल्मि बाजारात सहभाग घेतला जातो. निवड झालेले सिनेमे महोत्सवात दाखवले जाणार आहेत.

मंगेश देसाई आणि मायरा वायकुळ यांची मुख्य भूमिका असलेला ‘मुक्काम पोस्ट देवाचं घर’ हा सिनेमा चिमुकलीचं भावविश्व पडद्यावर उभं करतो. युद्धात हुतात्मा झालेल्या वडिलांना ती पत्र लिहिते. बापलेकीतला पत्रांमधून घडत असलेला हृदयस्पर्शी संवाद मन हेलावून टाकतो. तर प्रथमेश परब आणि शशांक शेंडे अभिनित ‘श्री गणेशा’ सिनेमात टिकल्या आणि त्याचे वडील भाऊसाहेब पाटील यांच्यातील तणावपूर्ण नातं आणि त्यांच्या नात्यातील समज, प्रेम आणि पुनर्मिलनाचा प्रवास दाखविण्यात आला आहे. हा चित्रपट पित्याच्या जबाबदारीची जाणीव, मुलाच्या भावविश्वातला संघर्ष आणि आपुलकीचा शोध या विषयांवर आधारित आहे.

ePaper
नवराष्ट्र Mumbai | 31 October 2025 | Page 6

भावनाचं सुंदर मिश्रण करत. | भाग म्हणून हा चित्रपट पुनसचायत करत नवा

## गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

## ‘मुक्काम पोस्ट देवाचे घर’ चित्रपटांची निवड



मांडण्यात आली आहे. सैन्यात असलेले वडील देवाघरी गेले असं आईनं मुलीला सांगितल्यावर देवाचं म्हणजे काय ? आणि ते कुठे असतं? याचा शोध सुरू होतो. त्याबरोबरच तिची आई शहीद पतीची पेन्शन मिळवण्यासाठी संघर्ष करत असल्याचं ट्रेलरमधून दिसतं. त्यामुळे भावनिकतेची किनार असलेल्या या कथानकाची मांडणी अतिशय रंजक पद्धतीनं केली आहे. गेल्या दहा वर्षांपासून मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यासपीठ मिळावे आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळावा या उद्देशाने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार व गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजारात सहभाग घेतला जात आहे.

सामना

## गोवा चित्रपट महोत्सवासाठी 'मुक्काम पोस्ट देवाचे घर', 'श्री गणेशा'

**मुंबई :** गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील 'फिल्म बाजार' विभागासाठी राज्य शासनाच्या वतीने यंदा संकेत माने दिग्दर्शित 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' आणि मिलिंद कवडे दिग्दर्शित 'श्री गणेशा' या दोन मराठी चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी गुरुवारी ही माहिती दिली. निवड झालेल्या चित्रपटांचे फिल्म बाजारमध्ये स्क्रिनिंग करण्यात येते. तसेच महोत्सव कालावधीपर्यंत निवडक चित्रपट रसिकांना पूर्व नावनोंदणी करून चित्रपट पाहण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात येते.




सामना


Mumbai Edition
Oct 31, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com


लोकमत

यांना दिला आहे.

## गोव्यात झळकणार 'मुक्काम पोस्ट देवाचे घर', अन् 'श्री गणेशा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील 'फिल्म बाजार' विभागासाठी राज्य शासनाच्यावतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत दरवर्षी मराठी चित्रपटांची निवड करून ते पाठविण्यात येतात.

यंदा 'फिल्म बाजार २०२५'साठी संकेत माने दिग्दर्शित 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' आणि मिलिंद कवडे दिग्दर्शित 'श्री गणेशा' या दोन मराठी चित्रपटांची निवड करण्यात आल्याची घोषणा महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी गुरुवारी केली.



मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यासपीठ मिळावे आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळावा, या उद्देशाने गेल्या दहा वर्षांपासून महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार व गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजारात सहभाग घेतला जात आहे. निवड झालेल्या चित्रपटांचे फिल्म बाजारमध्ये स्क्रिनिंग करण्यात येते. 'मुक्काम पोस्ट देवाचं घर'मध्ये एका लहान मुलीची कथा आहे.

तिचे वडील युद्धात शहीद झाल्यानंतर ती त्यांना 'देवाचं घर' येथे पत्रं लिहू लागते. त्या पत्रांमधून तिचा वडिलांशी होणारा भावनिक संवाद, आई-आजीसोबतचे नाते आणि बालमनातील संवेदना चित्रपटात दाखविण्यात आल्या आहेत.



**'श्री गणेशा'मध्ये प्रथमेश परबने साकारलेला मुलगा आणि वडिलांच्या रूपातील शशांक शेंडे यांच्यातील तणावपूर्ण नाते आणि त्यांच्या नात्यातील समज, प्रेम आणि पुनर्मिलनाचा प्रवास दाखविण्यात आला आहे.**


Hello Mumbai
Page No. 3 Oct 31, 2025
Powered by: erelego.com